**महात्मा गांधी नरेगा जागृती अभियान**
**दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०१२ या कालावधीत राज्यात राबविण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन निर्णय क्र.मगांराग्रारोहयो २०१२/प्रक्र. ८८/रोहयो-६ब.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०१२

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी कायदा १९७७ (सुधारणा २००६) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक १ एप्रिल २००८ पासून राबविण्यात येत आहे. अकुशल काम करण्यास इच्छूक असणा-या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेअंतर्गत कामाचे माध्यमातुन रोजगाराची हमी देऊन व त्या माध्यमातून कायम स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजूरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे तसेच पंचायत राज संस्थांना मजबूत करण्यावर योजनेत भर देण्यात आलेला आहे.

स्वयंपूर्ण ग्रामराज्याची उभारणी हा महात्मा गांधींचा संकल्प होता. तसेच खेडयाकडे चला असा त्यांचा संदेश आहे. त्या अनुषंगाने कृषी, ग्राम विकास, भुजल सर्वेक्षण, पाटबंधारे, महसूल, सार्वजनिक बांधकाम व जलसंधारण या राज्य शासनाच्या विविध विभागांनी एकत्रितरित्या नियोजन केल्यास गावाच्या संपूर्ण विकासाला योग्य ती चालना मिळेल व त्याद्वारे गाव स्वयंपूर्ण करण्यास मदत होईल. ही बाब विचारात घेऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत एक व्यापक अभियान राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण भागातील नागरिकांना उपरोक्त अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करण्यात आला असून या माध्यमातुन गरजू शेतकरी-शेतमजूर रोजगाराची मागणी करु शकतात. परंतु त्यांना या योजनेची माहिती तसेच अधिकाराची पुरेशी जाणीव नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब लक्षात घेऊन दिनांक २ ऑक्टोबर, २०१२ रोजी असलेल्या महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यात २ ऑक्टोबर,२०१२ ते ३१ ऑक्टोबर २०१२ या कालावधीत **महात्मा गांधी नरेगा जागृती अभियान** राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सदर अभियानाद्वारे या योजनेची संपूर्ण माहिती देऊन रोजगार हमी योजनेद्वारे गावाचा विकास करण्यासाठी प्रचार आणि प्रसिध्दी करण्यात येईल. या अभियानांतर्गत ग्राम पंचायत, ग्राम सभेचा सहभाग निश्चित करणे, गावाचा विकास आराखडा निश्चित करणे, कामांचे गुणवत्तापूर्ण नियोजन करणे, मजूरांची नोंदणी करणे, योजनेशी संबंधित अभिलेखे अद्ययावत करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.या अभियानाची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.

## अभियान समन्वय समिती

सदर अभियानासाठी प्रत्येक जिल्हयाचे ठिकाणी संबंधित पालक मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये जिल्हयातील खासदार यांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात यावे. तसेच जिल्हयातील सर्व आमदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, अधिक्षक कृषि अधिकारी, वन विभागाचे संबंधित अधिकारी, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे भुवैज्ञानिक अधिकारी हे सदस्य म्हणून राहातील. जिल्हयाचे उप जिल्हाधिकारी (रोहयो) हे सदर समितीचे सदस्य सचिव राहतील. सदर अभियान समन्वय समिती जिल्हयामध्ये अभियान राबविण्याचे नियोजन व संनियत्रण करेल. यासाठी अभियान समन्वय समितीने सप्टेंबर,२०१२ अखेरपर्यंत अभियानाची पूर्वतयारी बैठक घेऊन कार्यक्रमाची आखणी करावी.

## कार्यकारी समिती

महात्मा गांधी नरेगा जागृती अभियान राबविण्याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सदर समितीचे सहअध्यक्ष असतील आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.(ग्रामपंचायत) सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून काम करतील. सदर समिती अभियान समन्वय समितीने निश्चित केलेल्या कार्यक्रमाच्या आखणीनुसार अभियानाची अंमलबजावणी करेल.

विभागीय आयुक्त हे अभियानाचे नियंत्रक अधिकारी म्हणून त्यांचे विभागातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पातळीवरील सर्व संबंधित खात्याचे अधिकारी यांना मार्गदर्शन व समन्वय करतील.

## कार्यकारी समितीची कामे

कार्यकारी समितीचे बैठकीला जिल्हयातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, त्यामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना आंमत्रित करावे. या बैठकित योजनेसंबंधीची माहिती, अभियान कालावधीत करावयाच्या कामांची माहिती व त्याकरिता अंमलात आणावयाची कार्यपध्दत, रुपरेषा याबाबत चर्चा करण्यात यावी. योजनेची अंमलबजावणी, मागील कालावधीत झालेले आमुलाग्र बदल व त्याची फलश्रृती याबाबत अवगत करण्याकरिता ज्या तहसिलदार व गटविकास अधिका-यांनी उत्कृष्ट काम केले आहे त्यांना देखील बैठकीत निमंत्रित करण्यात यावे.

सदर अभियानाचे वेळापत्रक, राबविणा-या संबंधित यंत्रणा व दिनांक यांचा तपशील या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद करण्यात आला आहे.

## अभियान कालावधीत करावयाची कामे

१. **प्रचार व प्रसिध्दी -**

अभियानाची पूर्वतयारी म्हणून या अभियानास स्थानिक वृत्तपत्रांच्यामार्फत व केबल टी.व्ही. च्या माध्यमातून प्रसिध्दी देण्यात यावी. अभियानासाठी शासनाकडून भित्तीपत्रके,घडी पत्रके पुरविण्यात येतील. त्याचा

योग्य प्रकारे वापर करण्यात यावा. प्रत्येक ग्रामपंचायत व तालुक्यात शिवार फेरीचे आयोजन करुन अभियानाची प्रसिध्दी करावी. याकरिता दृकश्राव्य माध्यमांचा उपयोग करावा. अभियानांतर्गत शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विविध स्पर्धा ज्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा अंतर्भूत कराव्यात. उत्कृष्ट सहभागी स्पर्धकांना सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पारितोषिके देण्यात यावीत. दि. ५/५/२०१२ रोजी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाद्वारे परिशिष्ट-१ मध्ये समाविष्ट केलेली नवीन कामे उदा. कृषी विषयक कामे, पशुधनासंदर्भातील कामे, मत्स्यव्यवसायविषयक कामे, ग्रामीण स्वच्छता इ. कामांबाबत मोठया प्रमाणावर प्रसिध्दी करावी. सदर योजनेच्या माध्यमातुन झालेल्या गावाच्या विकासासंबंधीच्या यशोगाथा CD, पोस्टर्स किंवा योजना राबविणारे संबंधित यंत्रणा अथवा लाभार्थी यांचे प्रत्यक्ष अनुभव कथनामधुन लोकांपर्यंत पोहचविण्यात यावेत.

२. **ग्राम विकास आराखडा तयार करणे व नियोजन -**

सदर योजनेअंतर्गत २ ऑक्टोबर या दिवशी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्राम सभा आयोजीत करुन सन २०१३-१४ या वर्षाचे कामाचे नियोजनाच्या अनुषंगाने वार्षिक कृति आराखडा तयार करण्यात यावा. सदर ग्राम सभेमध्ये जास्तीत जास्त लोकाचा सहभाग होईल याची दक्षता घ्यावी. कामांचा कृति आराखडा गुणवत्तापूर्ण व्हावा याकरिता ग्रामसभेचे वेळापत्रक अशा पध्दतीने तयार करण्यात यावे की, ज्यामध्ये कार्यकारी यंत्रणेचे तांत्रीक अधिकारी हे हजर राहून ग्रामपंचायत क्षेत्राअंतर्गत उपयुक्त व कार्यान्वीत होणा-या कामांबद्दल माहिती देतील. योजनेंतर्गत शिवार फेरी घेण्यासंदर्भातल्या सूचना या अगोदरच देण्यात आलेल्या आहेत. शिवार फेरीच्या माध्यमातुन सन २०१३-१४ साठी लोकसहभागाने कामांची निवड करावी.

३. **अभियान कालावधीत प्रत्यक्ष कामे सुरु करणे-**

या अभियानाचे औचित्य साधून या सप्ताहात योजनेंतर्गत अनुज्ञेय कामांपैकी सार्वजनिक हिताची व वैयक्तिक लाभाची किमान दोन कामे सुरु करण्यात यावीत. अनुज्ञेय कामांची यादी सोबत **परिशिष्ट-क** मध्ये जोडण्यात येत आहे.

४. **जलसाक्षरता अभियान राबविणे -**

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत जलसंधारण व जलसंवर्धनाच्या कामांना प्राधान्य देण्यात आलेले आहे. या अभियानांतर्गत सदर कामांबाबत माहिती देणे, कामे घ्यावयाची कार्यपध्दती व त्याची उपयुक्तता पटवून देण्याकरिता विविध उपक्रम हाती घेण्यात यावेत.

५. **मजूर नोंदणी व जॉब कार्ड देणे-**

मजूरांचे नोंदणीकरिता नोंदणी अर्ज उपलब्ध करुन देणे व स्विकारणे, जॉब कार्ड देणे याकरिता प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये स्वतंत्र सुविधा कक्ष स्थापन करण्यात यावा.

६. **तक्रार निवारण -**

मजूर नोंदणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या सुविधा कक्षामध्ये तक्रार निवारणाचेही अर्ज स्वीकृत करण्यात यावेत. अभियान कालावधीत संबंधितांच्या तक्रारी ऐकून अथवा लेखी स्वरुपात घेऊन त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याची दखल घेण्यात यावी. अभियानाच्या दरम्यान तक्रार निवारणासाठी तक्रार निवारण अधिका-यांनाही बोलविण्यात यावे.

७. **अपूर्ण कामे पूर्ण करणे-**

केंद्र शासनाकडून अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम घेण्याबाबत यापूर्वीच सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्य शासनाने यापूर्वीच निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. याकरिता अभियान कालावधीत मोहीम स्वरुपात ही कामे पूर्ण करण्याच्या कार्यवाहीवर अधिक भर देण्यात यावा.

८. **उत्कृष्ट काम करणारी कार्यालये, अधिकारी व कर्मचारी यांना बक्षिस देऊन गौरविणे -**

महाराष्ट्रात योजनेअंतर्गत सन २०११-१२ या वर्षात योजनेचे अंमलबजावणीचे उत्कृष्ट काम झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने काही जिल्हे, तालुके व ग्राम पंचायती यांनी रोजगार पुरविणे, कार्यपध्दती, उपयुक्त कामे घेणे इत्यादी बाबींवर उत्कृष्ट काम केलेले आहे. या कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा अभियान कालावधीत सत्कार करणे समयोचीत राहील. पुरस्कार देण्याबाबतचे निकष जिल्हास्तरीय समितीने निश्चित करावेत. साधारणपणे तालुकास्तरावर तीन ग्राम पंचायत व जिल्हा स्तरावर त्यापैकी अंतीम तीन ग्राम पंचायतींची निवड करुन संबंधित सरपंच / ग्राम सेवक यांचा सत्कार करण्यात यावा.

योजनेची अंमलबजावणी करताना विविध स्तरावर नाविन्य पूर्ण उपक्रम हाती घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणीची दखल घेवून संबंधित कार्यक्रम अधिकारी व सह कार्यक्रम अधिकारी यांचा जिल्हास्तरावर सत्कार करण्यात यावा.

९ **MIS**

केंद्र शासनाने दिलेल्या निदेशानुसार योजनेची माहिती MIS संकेतस्थळावर नोंदविणे बंधनकारक आहे. तरी अभियानांतर्गत MIS वरील माहिती अद्ययावत करण्यात यावी. सर्वाधिक MIS नोंदी अद्ययावत असलेल्या तालुक्यातील कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, MIS Co-ordinator, Data Entry Operator यांना प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात यावे.

१०. **मजूरी वाटप -**

अभियान कालावधीत दिनांक १५.९.२०१२ पर्यंतच्या संपूर्ण थकित मजूरीचे प्रदान करुन याबाबत संबंधितांचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. तसेच ग्रामरोजगार सेवकांचे मानधन व कंत्राटी कर्मचा-यांचे मानधनसुध्दा दि. ३१ ऑगस्ट २०१२ पर्यंत पूर्णतः प्रदान करण्यात यावे.

११. **विविध योजनांची महात्मा गांधी नरेगा सोबत सांगड घालणे (अभिसरण) (Convergence)**

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घेण्यात येणा-या कामांमध्ये अभिसरण (Convergence) अनुज्ञेय आहे. याकरिता तांत्रिक विभागांची बैठक घेऊन महात्मा गांधी नरेगा मधील कामे व इतर विभागातील कामे यांची कशा प्रकारे सांगड घालता येईल याबाबत विचारविनिमय करावा जेणेकरुन महात्मा गांधी नरेगातील मजूरांना अन्य योजनेचा सुध्दा लाभ मिळू शकेल. त्याकरिता आपल्या जिल्हयाचे पालक मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली अभिसरण (convergence) मेळाव्यांचे आयोजन करावे.

१२. **ग्राम पंचायतीचे नवीन लेखे तयार करुन अद्ययावत करणे -**

राज्य शासनाने या संदर्भात शासन निर्णयाद्वारेआवश्यक निर्देश यापूर्वीच निर्गमित केले असून योजनेचे ग्राम पंचायतस्तरावरील अभिलेख्यांकरिता प्रपत्रे नव्याने विहित करुन दिली आहेत. अभियांनातर्गत नवीन प्रपत्रात अभिलेख अद्ययावत करुन घेण्यात यावेत.

सदर अभियानांतर्गत घेण्यात येणारी कामे ही निरंतर स्वरुपाची असून अभियानांतर्गत त्यांना गती देणे आवश्यक आहे. त्यामुळे अभियान संपल्यानंतरही सदर कामे सुरु ठेवण्यात यावी. तसेच दरवर्षी या कालावधीतच महात्मा गांधी नरेगा अभियान राबविण्यात यावे.

सदर अभियानांतर्गत होणारा खर्च प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय ६% निधीतून विहित प्रक्रियेचे पालन करुन करण्यात यावा.

सदर अभियान यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर एका आठवड्याच्या आत यासंबंधीचा प्रगती अहवाल सादर करणे प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना अनिवार्य राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२०९२११४०७०९१९०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो व जलसंधारण)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव
८) विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे.
९) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा)
१०) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११) महालेखापाल २(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२) प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
१४) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो).
१७) सर्व तहसिलदार.
१८) सर्व गट विकास अधिकारी.
१९) मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे
२०) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

२२) सर्व उपसचिव, अवर सचिव,सहायक संचालक(लेखा),कक्ष अधिकारी,
सांख्यिकीय अधिकारी (रोहयो प्रभाग)

२३) कक्ष अधिकारी, रोहयो-१, सारसंग्रहाकरिता

२४) निवडनस्ती, रोहयो-६-ब

## परिशिष्ट-अ

### अभियानाचे वेळापत्रक
### राबविणा-या संबंधित यंत्रणा व दिनांक यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अभियानांतर्गत घ्यावयाचे विषय | राबविणारी यंत्रणा | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हयांचे मा.पालक मंत्री महोदय यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ व इतर ठिकाणी सन्मा. लोकप्रतिनिधींच्या हस्ते शुभारंभ<br>अ) ग्राम विकास आराखडा (लेबर बजेट) तयार करण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन सन २०१२-१३ चे सुधारित लेबर बजेट तयार करणे<br>ब) सन २०१३-१४ चे वार्षिक लेबर बजेटचे नियोजन करणे. | ग्राम पंचायत, ग्राम सेवक व नरेगा क्षेत्रीय नियोजन अधिकारी | २ ऑक्टोबर,२०१२ (अनिवार्य दिनांक) |
| २. | मजूर नोंदणी व जॉब कार्ड देणे | ग्रामपंचायत | ३ ते ५ ऑक्टोबर,२०१२ |
| ३. | योजनेंतर्गत कामांना प्रसिध्दी देणे व अभिसरण (कनव्हर्जन्स)मेळावे आयोजीत करणे. | सर्व अंमलबजावणी यंत्रणा | ६ ते ९ ऑक्टोबर,२०१२ |
| ४. | अ) ग्राम दक्षता समितीची स्थापना करणे | ग्रामपंचायत | १०ऑक्टोबर,२०१२ (अनिवार्य दिनांक) |
| | ब) ग्राम दक्षता समितीचे फलक लावणे | | ११ ते १५ ऑक्टोबर,२०१२ |
| | क) योजनेंतर्गत निर्माण झालेल्या मत्तेचे फलक लावणे | | |
| ५. | ग्राम पंचायतीचे नवीन अभिलेखे तयार करुन अद्ययावत करणे व मस्टर ट्रॅकर अद्ययावत करणे. | ग्राम पंचायत | १६ ते २० ऑक्टोबर२०१२ |
| ६. | योजनेंतर्गत सर्व स्तरावरील MIS अद्ययावत करणे व Alerts कमी करणे | सर्व अंमलबजावणी यंत्रणा व MIS Coordinator | १६ ते २० ऑक्टोबर२०१२ |
| ७. | तक्रार निवारण मोहिम व यशोगाथा सादर करणे | सर्व अंमलबजावणी यंत्रणा | २० ते २३ ऑक्टोबर२०१२ |
| ८. | पोस्टातील खाते बँकेत स्थलांतर करण्याची विशेष मोहिम | गटविकास अधिकारी, पंचायत समिती | २५ ते ३१ ऑक्टोबर२०१२ |

## परिशिष्ट-ब

## अभियानांतर्गत द्यावयाचे पुरस्कार

| अ.क्र. | स्पर्धेचे स्तर | देय पुरस्कार |
|---|---|---|
| १ | तालुका स्तरावरील स्पर्धा -<br>१) घोषवाक्य<br>२) वक्तृत्व/वादविवाद स्पर्धा<br>३) चित्रकला | प्रथम क्रमांक - रु.३०००/-<br>द्वितीय क्रमांक- रु.२०००/-<br>तृतीय क्रमांक- रु.१०००/- |
| २. | जिल्हा स्तरावरील स्पर्धा<br>१) घोषवाक्य<br>२) वक्तृत्व/वादविवाद स्पर्धा<br>३) चित्रकला | प्रथम क्रमांक - रु.५०००/-<br>द्वितीय क्रमांक- रु.३०००/-<br>तृतीय क्रमांक- रु.२०००/- |

**( सदर बक्षिसे धनादेशाद्वारेच देण्यात यावीत.)**